# प्रेस नोट

दिनांक ०७/०५/२०१९

## वृत्तांकन

पथनाट्य प्रकल्प उद्घाटन सोहळा पुणे शहर पोलीस संस्था व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यामाने तसेच पुणे पोलीस आयुक्त श्री. के व्यंकटेशम यांच्या संकल्पनेमधुन आणि पंख या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने आज नेहरु मेमोरीअल हॉल पुणे कॅम्प येथे मा.पोलीस आयुक्त डॉ. व्यंकटेशम यांच्या हस्ते पथनाट्य प्रकल्पाचे उद्घाटन झाले.

बाल, महिला व जेष्ठ नागरिक यांना मदतीचा हात देण्यासाठी भरोसा सेल चे कर्मचारी रात्र दिवस झटत आहेत. त्याच बरोबर आजच्या या डिजिटल युगात सायबर संबंधित गुन्ह्यांमध्येही झपाट्याने वाढ होत आहे. सायबर संबंधित गुन्हे झालेल्या पिडीतांना मदत मिळावी यासाठी सायबर सेल सदैव तप्तर आहे. पथनाट्यामार्फत या विषयाबाबत जनजागृती करणे व पोलीस यंत्रणेत नागरिकांसाठी राबवत असलेल्या सेवांबाबत जनतेला माहिती करुन देणे हा या पथनाट्य प्रकल्पाचा मुख्य उद्देश असुन पुणे शहरातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत सदर पथनाट्याचा कार्यक्रत राबविण्यात येणार आहे.

पंख या सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्मिता आपटे यांनी सायबर गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेवुन क्विकहिल फाउंडेशन अध्यक्ष श्री. कैलास काटकर यांच्या सहायाने स्वतः सहभागी झाले अतिशय उत्साहवर्धक वातावराणात आजचा हा उद्घाटन सोहळा पार पडला. समाजात नागरिकांच्या हिताच्या व संरक्षणाच्या दृष्टीने पुणे शहर पोलीस राबविलेल्या विविध उपक्रमांची जनजागृती व्हावी या उद्देशाने पंख संस्था व क्विकहिल फाउंडेशन पुणे पोलीसांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जात आहे. व यापुढेही पुणे शहर पोलीसांची सेवा ॲप, बडीकॉप, पोलीस काका, दामिनी या प्रकल्पाव्दारे जनजागृती व्हावी यासाठी पंख संस्था व क्विकहिल फाउंडेशन पुणे यापुढेही पथनाट्य सादरीकरण करण्यात येणार आहे. आजच्या कार्यक्रमासाठी मा. श्री. के. व्यंकटेशम, पुणे शहर पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी व क्विकहिल फाउंडेशनचे सी.एस.आर. प्रमुख श्री. अजय शिर्के, पंख संस्था अध्यक्ष सौ. स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भाबड आणि इतर पंख संस्था कर्मचारी व पोलीस आदी उपस्थित होते. या पथनाट्य उपक्रमासाठी श्री. अजित लकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सौ. विजया कांरडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भरोसा सेल, सौ. राधीका फडके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर सेल प्रमुख श्री. बबन गायकवाड पोलीस उप निरीक्षक सेवा समन्वयक श्री. बाळासाहेब भोर, पोलीस उप- निरीक्षक विशेष बाल सुरक्षा पथक या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच अत्यंत बोलके व ह्रदयात भिडणारे असे हे पथनाट्य श्री. कुलदीप दगडे यांनी बसवले व श्री. संकल्प म्हाबळेश्वरकर यांनी लिहले आहे व आपल्या उत्कृष्ठ अभिनायाच्या जोरावर हे पथनाट्य रंगविण्याचे काम तरुण कलाकारांनीकेले पथनाट्य सादरीकरण केले. मा. पोलीस आयुक्त यांनी व मा. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच पथनाट्यांतील सर्व तरुण कलाकारांचे कौतुक केले व पंख संस्थेला पुढील कार्यसाठी शुभेच्छा दिल्या. संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्र संचालन सौ. मृणाल मापुस्कर यांनी केले व पंख संस्थेच्या अध्यक्ष. स्मिता आपटे यांनी आभार मांडले. कार्यक्रमाचे सर्व नियोजन पंख संस्थेचे समुपदेशक श्री. सचिन करंजुले व सौ. मृणाल मापुस्कर यांनी केले.

पोलीस स्टेशनच्या हद्दीत पथनाट्य सादरीकरणाच्या वेळी नागरिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घेण्यात यावा असे आव्हान पुणे पोलीस यांनी केले आहे.


पुणे पोलीस
Quick Heal
FOUNDATION


पुणे पोलीस
यांच्या संयुक्त विद्यमाने
भरोसा सेल व सायबर सेल
या विषयावरील
Quick Heal
FOUNDATION
पुणे पोलीस


पुणे पोलीस
Quick Heal
FOUNDATION